Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

Original Article

# भारतीय शास्वत संस्कृतीची अवस्था

**डॉ.प्रा. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले**
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड, जि. नागपूर
**Email**-puroshotampakhale@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170928
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9(A)
Pp. 139-141
September 2025

**Submitted:**23 Aug. 2025
**Revised:** 4 Sept. 2025
**Accepted:** 21 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

***गोषवारा***

*भारतीय सामाजिक व्यवस्था ही उत्तरंदडी प्रमाणे आधारित असून ही वरपासून खालपर्यंत असे अनेक विविध सामाजिक स्तर आढळून येतात. ज्यातून समाज कोणत्या प्रकारचा आहे. आणि भारतीय सामाजिक स्थिती कोणत्या प्रकारची आहे. हे आपल्याला कळून येते. सामाजिक व्यवस्था ही समसमान नसून वरच्या क्रमवारीत असलेल्या समूहाला जास्त अधिकार तर खालच्या वर्गाला कमी अधिकार सामाजिक व्यवस्थेने घेतलेले आपल्याला दिसते. काही समाज हे वरच्या घटकात असून काही समाजाची स्थिती ही खालच्या जातीचे दारिद्र्यामध्ये लीन झालेले दिसते.*

***मुख्य शब्द/विशेष शब्द-****भारतीय,सांस्कृति,व्यवस्था,रूढी,परंपरा,तिथी,सामाजिक ई.*

## प्रस्तावना

भारतीय सांस्कृतिक व्यवस्था ही जाती विशिष्ट काही घटकांनी निर्माण केलेली असून सामाजिक चालीरितीनुसार किंवा त्या समाजाच्या जातीच्या चालीरितीनुसार निर्माण झालेली आहे. चालीरितीनुसार रूढी परंपरा, तिथी सामाजिक पद्धतीने नसून जातीवर आधारित आहे. त्या जातीला जे अधिकार होते त्या त्या अधिकाराच्या अनुषंगाने त्या त्या चालीरीती आणि त्यांचे क्षेत्र निर्माण झालेले आपल्याला दिसते.

## भारतीय सांस्कृतिक अवस्था

भारतीय सांस्कृतिक व्यवस्था साविधानानुसार चालत आहे. हि संविधान संस्कृती आमच्या चालीरिती आणि रूढी पंरपरा या सांस्कृतिक व्यवस्था यापूर्वीपासून चालत आलेल्या असून त्याप्रमाणे येणाऱ्या काळामध्ये अधिका-अधिक त्यामध्ये भर पडत जाते. या संविधानाची निर्मिती होत होती यासंबधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, “अस्पृश्य समाजाच्या कल्याणासाठी माझे घटना समितीत जाणे अत्यंत जरूर होते मी घटना समितीमध्ये निवडून येऊ नये म्हणून ----- सर्व ठिकाणी कुलूपे लावली महाराष्ट्राची काही थोडी माणसे आहेत त्यामध्ये नामांकित म्हणून माझी गणना होणार नाही असे म्हणणारा माणूस मूर्ख असला पाहिजे.”१ असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या माझी आत्मकथा या पुस्तकात सांगतो. पृष्ठ क्र. ७१ चालीरिती प्रथा त्या त्या वर्तमान काळानुसार परिणाम करत असून त्या त्या काळातील क्वालिटीचा आणि पोशाख व्यवहाराचा परिणाम त्या संस्कृतीवर होत असतो.

भारतीय सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था ही अत्यंत प्राचीन, समृद्ध आणि विविधतेने नटलेली आहे. जात हि त्यापैकी एक आहे. मी. सेनार्ट हा फ्रेंच विद्वान म्हणतो, “जात एका विशिष्ट धंद्याशी निगडित असते. जातीतील लोकांचा परस्परांतील संबंध मुख्यत रोटी बेटी व्यवहार व सार्वत्रिक उत्सवांनी नियंत्रित होती. विटाळाराच्या मर्यादा वेगवेगळ्या असतात. परंतु समाजप्रमुखाला विशिष्ट प्रकारचे दंड थोटावण्याचा पूर्णता अधिकार देण्यात आलेला असतो.”२ पृष्ठ क्र.१५ तिचा अभ्यास करताना आपल्याला इतिहास, धर्म, परंपरा, रीतिरिवाज, कला, भाषा, जातिव्यवस्था, कुटुंबव्यवस्था इत्यादी अनेक अंगांचा विचार करावा लागतो. खाली त्याचे थोडक्यात विवेचन दिले आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.प्रा. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले, मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय नरखेड, जि. नागपूर*

**How to cite this article:**
*पखाले, . पुरुषोत्तम . गुणवंतराव . (2025). भारतीय शास्वत संस्कृतीची अवस्था. Journal of Research and Development, 17(9(A)), 139–141.* https://doi.org/10.5281/zenodo.17511629

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17511629
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

सामाजिक व्यवस्था अनेक सामाजिक स्थरांनी बनलेली असते. उद. कुटुंबव्यवस्था भारतीय समाजात संयुक्त कुटुंबपद्धती परंपरेने महत्त्वाची राहिली आहे. उदा. "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दारी, असे एक वचन आहे. जी ही उद्याच्या भावी पिढीची कर्णधार आहे. लहान मुल जन्माला आल्यापासून कर्तृत्ववान होईपर्यंत आईच्या सानिध्यात असते. आई जर शिक्षित, सुसंस्कारित असेल तर ती आपल्या मुलांच्या चांगल्या प्रकारे घडवू शकते. हे लक्षात घेऊनच भारतामध्ये स्त्रियांना शिक्षित केले पाहिजे. ह्या भावनेचा उदय झाला."[३] पृष्ठ क्र. २१ आज आधुनिकतेमुळे एकल कुटुंबे वाढली असली तरी नातेवाईकांतील घट्ट बंध अजूनही टिकून आहेत. जातिव्यवस्था प्राचीन काळी समाजाची विभागणी वर्णव्यवस्थेवर (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र) आधारित होती. पुढे ती जातिव्यवस्थेत परिवर्तित झाली.

भारतात पूर्वपार चालत आलेल्या संस्कृती चा उत्सव म्हणून साजरा करण्यात येतो या उत्सवात प्रत्येक जाती धर्मातील विविध अतिथी दिवस अतुधी परंपरा यांचा समावेश असतो या उत्सवांच्या मध्ये समावेश करण्यासाठी अनेक प्रकारच्या जाती-धर्मांचा त्या ठिकाणी उल्लेख आढळतो हे जातीधर्म आपापल्या संस्कृतीनुसार या सर्व उत्सवांना प्रोत्साहन देत असतात सहभागी होत असतात आणि त्यामध्ये सहभागी होताना जे जे उत्सव आपण अधोधी परंपरेनुसार साजरे करत आहोत त्या त्या रोजी परंपरेनुसार असलेले पोषक पक्वान्न आणि तिथे दिवस पार पाडत असतात मग ते कोणत्याही धर्माची किंवा देवीदेवतांची पूजा असो अचना असो किंवा इतर काही प्रकारचे देण असो ते सर्व या दृष्टिकोनातून साजरी होत असतात. भारत "सणांचा देश" म्हणून ओळखला जातो. दिवाळी, होळी, ईद, ख्रिसमस, गुरुपुरब, बुद्ध पौर्णिमा असे असंख्य सण सामाजिक ऐक्य व सांस्कृतिक रंगत वाढवतात.

आज संविधानामुळे सर्वांना समान हक्क मिळाले आहेत, तरी काही ठिकाणी जातीय भेदभाव जाणवतो. प्राचीन काळी स्त्रियांना शिक्षण आणि समाजात मानाचे स्थान होते, पण काळानुसार त्यांच्या भूमिकेत मर्यादा आल्या. आज शिक्षण, नोकरी, राजकारण, विज्ञान, कला या सर्व क्षेत्रांत स्त्रिया अग्रस्थानी आहेत. जॉन स्टुअर्ट मिल म्हणतो "लोकसत्तेत बहुसंख्यता जी हुकुमशाही असते. अशा बहुसंख्येकाचा भ्रष्टाचार हा प्रसार पावतो. लोकशाहीत अकार्यक्षम व स्वार्थी लोकांच्या हाती सत्ता जाते. खोट्या आश्वासनाच्या व भुलथापांच्या बळावर लोक निवडून येतात."[४] पृष्ठ क्र. ७५ मराठी व्याकरण निबंध व पत्रलेखन-निर्मला काकडे साईनाथ प्रकाशन नागपूर. २०२१ "तिथी सामाजिक सामाजिक सुधारणा महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या सुधारकांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीशिक्षणविरोध अशा प्रथांविरुद्ध लढा देऊन समाजात समता, बंधुता, न्याय यांचा पाया मजबूत केला." यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "बुद्धाने भारतातील स्त्रियांना जे स्वातंत्र्य दिले आहे. त्याचे महत्त्व मापन करता येत नाही. भिक्षूनी संघ भिक्षुनेसंघाच्या स्वामित्वाखाली बुद्धाने ठेवला हे लांचनास्पद होय, असे मानतात त्यांनी बुद्धाने स्त्रियांना दिलेले स्वातंत्र्य लक्षात घेतले तर ते आपला आरोप चुकीचा आहे हे मान्य करतील. बुद्धाने स्त्रियांना जे स्वातंत्र्य दिले ते तकलादून नव्हते."[५] पृष्ठ क्र १४ सांस्कृतिक व्यवस्था धर्म आणि अध्यात्म, भारत हा विविध धर्मांचा देश आहे. हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, पारशी. धर्मामुळे भारतीय संस्कृतीला अध्यात्मिक पाया लाभला आहे. भारतात शास्त्रीय नृत्ये (भरतनाट्यम, कथक, ओडिसी), संगीत (हिंदुस्थानी व कर्नाटकी), नाट्यकला, चित्रकला, हस्तकला यांची परंपरा प्राचीन आहे. संस्कृत, हिंदी, मराठी, तमिळ इत्यादी भाषांत समृद्ध साहित्य परंपरा आहे.

भारतीय संस्कृतीनुसार, भारतातील सर्व विविध प्रकारच्या राज्यामध्ये आणि तिथे राहणाऱ्या सर्व जनसमूहातील कुटुंबात जेव्हा जेव्हा पाहुण्यांचे आगमन होते तेव्हा या पाहुण्यांना अतिथी देवो भव म्हणजे त्यांना देवाची उपमा देऊन देवाप्रमाणे त्यांचे स्वागत केल्या जाते त्यांना कुटुंबात असेपर्यंत कुटुंबाचा एक भाग बनवून त्यांचा सन्मान केल्या जातो हीच आमच्या भारतीयांची ओळख आहे तोच आमच्या संस्कृतीचा आत्मा आहे असे आम्ही मानत असतो 'अतिथी देवो भव, वसुधैव कुटुंबकम्', अशा संकल्पना भारतीय संस्कृतीचा आत्मा मानल्या जातात. कुटुंबकेंद्री, बंधुत्वशील, निसर्गाशी सुसंवाद राखणारी ही परंपरा आहे.

भारत हा देश विविध भाषांनी विविध पोशाखाने विविध संस्कृतीने भरलेला आहे त्याची खरी ताकद ही त्यांच्या सांस्कृतिक मध्ये बोलीभाषेतून प्रकट होत असते ती बोलीभाषा आणि त्या भाषेचे अस्तित्व संपूर्ण भारतात जाणवत असून ते काही अंतरावर सतत बदलत जाते म्हणजे विशिष्ट समूहाची विशिष्ट भाषा आणि त्याची संस्कृती ही थोडी फार फरकाने वेगळी असल्याचे जाणवते म्हणून भारतीय संविधानाने या सर्वांचा अभ्यास करून आमच्या भारतामध्ये एकूण २२ भाषांना अधिकृतपणे मान्यता प्रदान केलेली आहे या सर्व भाषा भारताच्या विविध प्रांतात दर्या खोऱ्यात आणि प्रत्येक समूहात बोलल्या जातेभारतात २२ अधिकृत भाषा आणि शेकडो बोलीभाषा आहेत. ही विविधता हीच भारतीय संस्कृतीची खरी ताकद आहे.

२१ व्या शतकामध्ये जग हे जवळ आलेले आहे. म्हणून जागतिकीकरणाच्या दृष्टीने आपण आधुनिक बदल स्वीकारले पाहिजे. त्या तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाची आवश्यकता त्यातील बदल हे कस कसे होत आहे. सांस्कृतिक कशी बदलत आहे. संस्कृतीतील बदल आधुनिक विकासाचे बदल आणि तंत्रज्ञानाचे बदल या तिन्ही दृष्टीने विचार केलास आमच्या परंपरेवरती या तीनही बदलांचा कोणता परिणाम होतो. चांगला बदल समाजाच्या आणि सामाजिक करण्याच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे. पण सामाजिक करण्याच्या दृष्टीने बदल हा विपरीत परिणाम घेऊन येत असेल. तर तो स्वीकारणे अयोग्य होईल का याचाही विचार आपण जागतिकीकरणांमध्ये केला पाहिजे जागतिकीकरणांमध्ये आपण याचा विचार केला नाही तर आमची सांस्कृतिक व्यवस्था हीच झपाट्याने अवस्थेत बदलल्याशिवाय राहणार नाही. ही चेतावणी जागतिकीकरण प्रत्येक क्षणाला प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक समाज घटकाला आणि प्रत्येक देशाला देत असल्याचे ठोके आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**निष्कर्ष**

१. भारतीय समाज व्यवस्था ही उतरंडीप्रमाणे आधारीत असून तिची दशा म्हणजे अवस्था ही अतिशय वरपासून खालपर्यंत पाहिल्यास तिचे अस्तित्व जागतिकीकरणाच्या दृष्टिकोनातून शून्य आहे. कारण ती उच्च आणि नीच या अस्पृश्य वर्ण व्यवस्था या सर्व दृष्टीने ती क्रमवारी लावते.
२. भारतीय सामाजिक अवस्था ही काही जाती विशिष्ट घटकांनी बनलेली आहे. आणि या जाती त्यांच्या त्यांच्या रूढी-परंपरा तेथे सामाजिक उत्सव मानतात. या जाती आपापली वर्णव्यवस्था टिकून ठेवता त्यामुळे या एकत्र येऊ शकत नाही.
३. भारतीय घटनाकार आणि जातिव्यवस्थेला आळा देण्याचे काम करण्याच्या दृष्टीने जाती विरहित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी संविधानात अनेक प्रकारची बंधन टाकलेली आहे. परंतु संविधानाच्या कलमांना समाज मान्यता अजून पर्यंत मिळालेली नाही. किंवा सामाजिक दृष्ट्या लोकांनी ते जाणून-बुजून दूर लक्ष केले असे दिसते.
४. भारतातील प्राचीन संस्कृती उदाहरणार्थ मोहनजोदरो-हडप्पा आणि राखीगडी या संस्कृतीचा अभ्यास केल्यास असे दिसते की, प्राचीन संस्कृती आताच्या संस्कृतीपेक्षा पुढारलेली होती. त्यात जातीव्यवस्था नव्हती धर्म व्यवस्था नव्हती तर एकल मनुष्य मानव जात ही त्या ठिकाणी वावरत होते. त्यानुसार त्यांचे तेथे लग्न संबंध रोटी बेटी व्यवहार सर्व समूहामध्ये होत होते आणि म्हणून तेव्हाची संस्कृती आताच्या संस्कृतीशी निगडी आहे असे पूर्णता म्हणता येणार नाही.
५. सोबतच एकूणच सर्व जगाची परिस्थिती पाहता जग जागतिकीकरणामुळे जवळ आलेले आहे. त्यांचे आपसातील संबंध अतिशय रेशीम धाग्याने जोडलेले आहे. प्रत्येक देश आपापली संस्कृती तेथे जगावर लादण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांच्या सीमा रेषा ओलांडित ते आपल्या देशाचा भूभाग आणि इतर सर्व संबंधित सांस्कृतिक वाढवण्याच्या दृष्टीने आटोकाट प्रयत्न करत आहे. म्हणून आज असे वाटते की जग हे एका विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहे की काय?

**सारांश**

सामाजिक रूढी परंपरा आणि रीतिरिवाज सामाजिकवस्थावर बदल घडवत असतात. आधुनिक बदल जागतिकीकरण, तंत्रज्ञान, शहरीकरण यामुळे भारतीय सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेत झपाट्याने बदल होत आहेत. युवक वर्ग आधुनिक जीवनशैली स्वीकारत असला तरी तो परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करत आहे.
भारतीय सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था ही बहुविधतेत एकता या तत्त्वावर आधारलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. माझी आत्मकथा- डॉ. बाबासाहेब आंबेडकर,चित्र प्रकाशन नागपूर, २०१४, पृष्ठ क्र. ७१
२. जातिभेद निर्मूलन – डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,राज प्रकाशन यवतमाळ-२००४ पृष्ठ क्र.१५.
३. मराठी व्याकरण निबंध व पत्रलेखन-निर्मला काकडे साईनाथ प्रकाशन नागपूर. २०२१ पृष्ठ क्र. २१
४. तंत्रेव - पृष्ठ क्र. ७५
५. हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती - डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,रोडगे प्रकाशन नागपूर-२०२२-२३ पृष्ठ क्र. १४